ISSN: 2350-0905

# CTBC's INTERNATIONAL JOURNAL

*Special Issue on*

## दलित साहित्याच्या बदलत्या दिशा

Volume: 1/ Issue: 2 (Special Issue)
November 2014

Website: www.ctboracollege.edu.in
Email: ctbcsirj@gmail.com

# राष्ट्रीय चर्चासत्र

(विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने)

# 'दलित साहित्याच्या बदलत्या दिशा'

## शोधनिबंधसंग्रह

**(NATIONAL CONFERENCE)**

दि. २८ व २९ नोव्हेंबर २०१४

मार्गदर्शक

प्राचार्य नंदकुमार निकम

मुख्यसंपादक

प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत

मराठी विभाग प्रमुख,
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग

कार्यकारी संपादक

प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे
सहाय्यक प्राध्यापक

प्रा. क्रांती पैठणकर
सहाय्यक प्राध्यापक


मराठी विभाग

शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाचे

चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,

(नॅक मानांकित 'ए' दर्जा प्राप्त)

शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे. ४१२२१०. (महाराष्ट्र — भारत)

**Email : ctborainfo68@gmail.com**

**Website : www.ctboracollege.edu.in**

# अनुक्रमणिका



| शोधनिबंध क्रमांक | शोधनिबंधाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **दलित आत्मकथन** | |
| १. | दलित स्त्री आत्मकथन: बदलत्या जाणिवा.<br>प्रा. डॉ. शोभा पाटील | ०१ |
| २. | दलित आत्मचरित्र : आत्मकथने बदलत्या दिशा.<br>प्रा. दत्तात्रय सदाशिव सावंत | ०९ |
| ३. | दलित स्त्री : आत्मकथनांची बदलती दिशा.<br>प्रा. धनेश मधुकर हरड | १३ |
| ४. | दलित आत्मकथनांचे स्वरूप व दिशा.<br>प्रा. भाऊसाहेब गव्हाणे. | १७ |
| ५. | दलित आत्मकथने : बदलती दिशा<br>प्रा. दया जेठे. | २१ |
| | **दलित कविता** | |
| ६. | दलित कवितेचे बदलते स्वरूप.<br>प्रा. युवराज देवबा भांबरे | २५ |
| ७. | दलित कविता : बदलत्या दिशा<br>प्रा. डॉ. विकास प्रभाकर वीर | २९ |
| ८. | दलित कविता : बदलत्या दिशा<br>प्रा. संदीप चपटे | ३४ |
| ९. | केशव मेश्राम यांची दिशादर्शक कविता<br>प्रा. प्रभाकर रामचंद्र पवार | ३८ |
| १०. | सिध्दार्थ तांबे यांच्या कवितेतील बदलत्या दलित जाणिवा.<br>प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत | ४५ |
| ११. | दलित कविता : बदलत्या दिशा<br>प्रा. कांती हरेश पैठणकर | ५० |
| १२. | अरूण काळे यांच्या कवितेतील 'प्रेम' मूल्याचे चित्रण.<br>अरूण ठोके | ५६ |
| १३. | दलित कवितेच्या बदलत्या दिशा<br>सर्मिंदर घोक्षे | ६० |
| १४. | दलित कविता : बदलत्या दिशा<br>प्रा. योगिता रांधवणे | ६६ |
| | **दलित कादंबरी/कथा** | |
| १५. | दलित कादंबरी : बदलती दिशा व स्थित्यंतरे<br>प्रा. निशा भंडारे | ७० |
| १६. | दलित कादंबरीतील परिवर्तनवादी स्त्री चित्रणे<br>प्रा. डॉ. मंगल डोंगरे | ७४ |
| १७. | दलित कादंबरीच्या बदलत्या दिशा<br>ईश्वर रंगनाथ ढोले | ७७ |
| १८. | दलित कथेतील स्त्रीदर्शन व बदलत्या दिशा<br>प्रा. डॉ. जया कदम | ८१ |
| १९. | दलित कथा : बदलत्या दिशा<br>प्रा. शामराव आबाजी सावंत | ८६ |
| २०. | हिंदी दलित कहाणीचे बदलते स्वरूप<br>डॉ. बाळासाहेब सोनवणे. | ८८ |

# दलित कविता : बदलत्या दिशा

**प्रा. रांधवणे योगिता**

राधाबाई काळे महिला महाविद्यालय,अहमदनगर.

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर जे अनेक साहित्य प्रवाह उदयाला आले.त्यामध्ये दलित साहित्य प्रवाह अत्यंत महत्वाचा ठरला.कोणत्याही भाषेतील जींवत साहित्यात नित्यनवेप्रवाह उदयाला येत असतात हे प्रवाह साहित्य समृध्द करीत असतात. आणि साहित्याचे चैतन्य टिकवीत असतात. नवे प्रवाह निर्माण झाले नाही किंवा नव्या जाणिवेतुन लेखन करणारा लेखकवर्ग उदयास आला नाही. तर ते साहित्य नि:सत्व दुबळे होते.म्हणूनच साहित्य प्रवाह हे आवश्यक आहेत. १९६० नंतर ख-या अर्थाने हा नववाड्मय प्रवाह पुढे आला.दलिताने लिहिलेले ते दलित साहित्य असे सुरूवातीला म्हटले गेले पण आज या संकल्पनेत बदल झालेला दिसतो. या दलित साहित्य प्रवाहात अनेक प्रामुख्याने दलित जीवनातील दु:खाचा काव्यपूर्ण स्वर निनादतो आहे.

दलित साहित्याच्या व्युत्पत्तीबाबत अनेक मतमतांतरे आहेत. या षब्दाचा षब्दश: अर्थ दळले गेलेले. दळित या शब्दापासुन 'दलित' हा शब्द तयार झाला असावा. अन्याय सहन करणारे षडलेले असे ते दलित होय हा एक अर्थ होतो.

प्रा.केशव मेश्राम –"अस्पृश्य वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे".

डॉ.भालचंद्र फडके – " दलित जाणिवेतुन दलित जीवनाचे भेदक दर्शन घडविणारे साहित्य हे दलित साहित्य "

मराठी साहित्यामध्ये जे अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत.त्यामध्ये दलित साहित्य प्रवाह १९६० नंतर नजरेत षण्यासारखा आहे.आपल्या जीविताच्या अंत:काळी गौतमबुध्द आपल्या अनुयायांना म्हणाले होते की, " मित्र हो तुमचे दीप तुम्हीच व्हा." त्यांचे म्हणणे खरे होते आपल्या भाग्याचे शिल्पकार आपणच आहोत असेच त्यांना सूचवायचे आहे.म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुक्तीसंग्रामाचे एक उद?दिष्ट वर्णव्यवस्थेची पाळेमुळे खणून काढणे हे ठेवलेले होते. याच तत्वज्ञानातुन दलित साहित्याची निर्मिती झाली आहे.

<u>दलित कविता –</u>

दलित कवितेत प्रामुख्याने दलित जीवनातील दु:खाचा काव्यपूर्ण स्वर निनादतो आहे,आणि विद्रोहपण आहे.दलित कविता ही प्रामुख्याने समूह जीवनाला क्रांतीप्रवृत्त करते.दलित कवितेमध्ये अत्यंतिक उत्कटता आहे.ती प्रक्षोभक वाणीची बनते.वेदना आणि दु:ख व्यक्त करीत नकार आणि विद्रोहाने समोर येते.मुलत: दलित वाड्मय म्हटल्याबरोबर वाचकांसमोर प्रथम दलित कविताच येते. दलित कविता संख्यात्मक दृष्टिने विपुल आहेत.

## दलित कवितेच्या बदलत्या दिशा —

वरील कवींच्या कवितेचा उद्रदेश पाहता सर्वच कवी आपल्या कवितेतुन गावकुसाबाहेरच्या माणसांचे दु:ख वेदना व्यक्त करतात.कोणी क्रांतीची भाषा करते कोणी विद्रोह मांडतो.बदलणा—या जगाची अपेक्षा आणि जागेपणा या कवितातून व्यक्त होतांना दिसते.सुरूवातीची दलित कविता बदलाच्या दिशेने प्रवास करू लागलेली दिसून येते ते पुढीलप्रमाणे —

१) दलित कविता क्रांतीसन्मुख झाली आहे —

दलित कवितेत प्रारंभी जागृतीवर भर होता.आता ती कविता आंबेडकरांना समोर ठेवून क्रांतीची भाषा बोलते आहे.महाडच्या चवदार तळयाच्या मुक्तीलढयापासून ही कविता वेगळया दिशेने म्हणजेच क्रांतीसन्मुख झाली आहे ते आजपर्यत.

२) विद्रोह आणि नकाराची जाणिव —

दलित कवितेत दु:ख आणि वेदना आहे आणि हे नष्ट व्हावे म्हणून ही कविता परंपरेला नकार देते.प्रस्थापितांबद्दल विद्रोह व्यक्त करते दलित कविता ही आता नकार व विद्रोहाने व्यक्त झालेली आहे आणि होत आहे.

३) बंडखोरीची भाषा —

ही कविता आता प्रस्थापिताविरूध्द बंडखोरीची भाषा बोलू लागली आहे. या भाषेतून दाहकता ठिबकत राहते. ही कविता आव्हानाची भाषा बोलते ती अंतरंगाला स्पर्श करते. मुक्तीसंग्रामाचे गीत गाते.

४) मानवता,बुध्दिनिष्ठा,सामाजिक बांधीलकीची नवी दिशा —


दलित कवितांचे तत्वज्ञान नकारात्क आहे यांचा अर्थ असा नाही की तिला विधायक तत्वज्ञान नाही.या कवितेत आता मानवता बुध्दिनिष्ठता आणि एकत्र येवून सहकार्यातुन बदल घडवणारी सामाजिक बांधिलकीची जाणिव निर्माण होऊ लागली आहे.

५) सामाजिकता हेच अंतिम मुल्य —

दलित कविता आता वेगळया दिशेने मार्गक्रमण करतांना दिसते आहे. संकुचित भावना सोडून दलित कवी आता सर्वसमावेशक अनुभव मांडू लागले आहे.दलित समाजाचे दु:ख प्रातिनिधक दु:ख मानून ते लिहू लागले आहेत.

६) दलित जीवनाचे खरे दर्शन घडविणारी कविता —

जी कविता दलित जीवनाचे खरे दर्शन घडविते तिच दलित कविता होय. दलित मनाला येणारे अनुभव यात समाविष्ट असतात




**The Editor**
CTBC's **International Research Journal**

**c/o The Principal,**
Chandmal Tarachand Bora College, Shirur, Dist. Pune
Pin - 412210 (M.S.) India
Contact : 02138 222301, 224170 Fax : 02138 - 224170
Website : www.ctboracollege.edu.in
Email: ctbcsirj@gmail.com